**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**अधिसूचना**

क्र. – ७९/२०२२ दिनांक– ३०/६/२०२२

**विषय - <u>अधिसभा निवडणूक २०२२</u>**
**नोंदणीकृत पदवीधर (Registered Graudate) म्हणून नांव नोंदणीबाबत**

सर्व संबंधितांच्या माहितीसाठी कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १३१ मधील तरतूदीनुसार उन्हाळी-२०२१ पर्यंत फक्त या विद्यापीठातील म्हणजेच संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातून पदवी परीक्षा (Under Graduate only) उत्तीर्ण झालेल्या पदवीधरांकडून नोंदणीकृत पदवीधर म्हणून नांव नोंदणीसाठी माहिती विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळाच्या डॅशबोर्डवरील ELECTION PORTAL 2022 मध्ये दिलेल्या लिंक च्या माध्यमातून ऑनलाईन पद्धतीने, महाराष्ट्र शासनाने एकरूप परिनियम क्र. २/२०१७ द्वारे विहित केलेल्या नमुना अर्जामध्ये दिनांक १.७.२०२२ ते २०.७.२०२२ या कालावधीत मागविण्यात येत आहे. ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरतांना दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. ऑनलाईन अर्जाची प्रिंट घेऊन त्या अर्जासोबत खालील आवश्यक दस्तावेजांच्या छायांकित प्रती आणि नोंदणी शुल्क रू. २०/- (अक्षरी रूपये वीस फक्त) ऑनलाईनद्वारे अथवा ऑफलाईन म्हणजे विद्यापीठाच्या काऊन्टरवर रोखीने भरून, पैसे भरलेल्या पावतीचा एक भाग जोडून असे अर्ज, शुक्रवार, दिनांक २२.७.२०२२ पर्यंत कार्यालयीन वेळेत (सुटीचे दिवस वगळून) विद्यापीठाच्या केंद्रीय आवक शाखेत स्वीकारण्यात येतील.

**आवश्यक दस्तावेज -**

**(क) पदवी प्रमाणपत्र**

**(ख) निवासाचा पुरावा (आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र, शिधापत्रिका, पारपत्र, विद्युत वापर देयक, वाहन चालन परवाना यापैकी एक पुरावा)**

**(ग) पैसे भरल्याची पावती (पैसे ऑनलाईन भरले असल्यास आवश्यक नाही.)**

१) यापूर्वी ज्या पदवीधारकांची विद्यापीठाने तयार केलेल्या पंजीकृत पदवीधरांचे Volume-I, II, III, IV, V & VI मध्ये पंजीकृत पदवीधर म्हणून नोंदणी झालेली असेल अशा पंजीकृत पदवीधरांनी पुन्हा नव्याने नोंदणी करण्याची आवश्यकता नाही. (नाव नोंदणी करण्यापूर्वी संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेल्या Volume-I, II, III, IV, V & VI मध्ये नाव असल्याची खात्री करून घ्यावी. नाव नसेल तरच नांव नोंदणी प्रक्रियेत सहभाग घ्यावा.)

२) कृषी विद्यापीठाच्या पदवीधरांनी तसेच इतर अकृषी विद्यापीठाच्या पदवीधरांनी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा नोंदणीकृत पदवीधर म्हणून नांव नोंदणीसाठी अर्ज करू नये.

३) इतर विद्यापीठातून पदवी घेतलेले आणि संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातून पदव्युत्तर पदवी प्राप्त केलेल्यांनी सुद्धा नांव नोंदणीसाठी अर्ज करू नये.

४) विहित मुदतीनंतर आलेले तसेच अपूर्ण अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत तद्वतच यासंदर्भात संबंधित अर्जदारासोबत कुठल्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची सर्व संबंधितांनी कृपया नोंद घ्यावी.

स्वा/-
(तुषार देशमुख)
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ